# पहिले ईपीसी इंडस्ट्रीजच्या कृषी केंद्राचे बुलडाण्यात उद्घाटन

बुलडाणा (प्रतिनिधी)

महिंद्रा अँन्ड महिंद्राच्या कृषी इक्वीपमेंट विभागाने विकसीत केलेल्या ट्रॅक्टरला भारतीय शेतक-यांनी गेली 29 वर्षे सातत्यांनी पसंती दिली आहे. या ट्रॅक्टरने भारतीय बाजार पेठेतील नेतृत्व केले आहे. ईपीसी इंडस्ट्रीजच्या वतीने पहिले कृषी शोरुम प्रतिक्षा इरिगेशन येथे सुरु करण्यात आले आहे. या शोरुमचे आज मोठ्या थाटात उद्घाटन करण्यता आले आहे.

या केंद्राचे उद्घाटन इंडस्ट्रीजचे कार्यकारी संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शर्मा व बुलडाणा अर्बनचे सर्वेसर्वा राधेश्याम चांडक यांच्या हस्ते करण्यात आले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा केंद्रीय सहकारी बँकेचे अध्यक्ष धृपदराव सावळे हे होते. तर ईसीपी इंडस्ट्रीज लिमिटेडचे वरिष्ठ उपाध्यक्ष ग्लोबल सेल्स आणि वितरणचे सुनिल ज़ॉनसन, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी पी.के.लहाळे, जिल्हा माहिती अधिकारी रवि गिते, चिखली शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रामकृष्ण शेटे, प्रतिक्षा इरिगेशनचे संचालक प्रल्हाद पंडीत यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. हे केंद्र महाराष्ट्रातून प्रथम बुलडाण्यात कार्यान्वीत झाले आहे. पुढील पाच वर्षामध्ये



देशभरात विविध ठिकाणी अशी केंद्रे सुरु करण्यात येणार असल्याचे सांगून अशोक शर्मा म्हणाले की, महिंद्रा अॅन्ड महिंद्राच्या वतीने शेतीशी संबंधीत तंत्रज्ञान देशातील प्रत्येक शेतक-यापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. त्यातून शेतकरी कृषी तंत्रज्ञानाने समृध्द होतील. तसेच शेतक-यांना अद्यावत कृषी सल्ला देण्याचीही व्यवस्था करण्यात आली आहे. शेतक-यांना त्यांच्या अगदी जवळ कृतीबाबत अचुक माहिती आणि सेवा देण्याची सुविधा या वितरण केंद्राच्या माध्यमातून प्रथमच मिळत आहे. देशभरात अशा प्रकारची दालने शेतक-यांसाठी कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.